२००९ मराठी अधिवेशन म्हणजे वेळेचा आणि पैशाचा अपव्यय होता. अधिवेशनांत संयोजकांनी केलेल्या घोडचुका सांगू किती आणि लपवू किती असंच झालंय.

जवळजवळ ९७. ३१ टक्के प्रेक्षकांचं मत पडलं की निराशा भोसले कार्यक्रम १०० टक्के पडला्. कांही लोकांना असं वाटलं की सुयोगची हास्यपचंमी फक्त अर्ध्या सभागृहानेंच बघितली. मी स्वतः तिथे हजर होतो आणि मी चर्क्षुवै सत्यम सांगू शकतो की ज्या बिचाऱ्यांचे गुढगे आखडून गेले होते ते फक्त सुयोगची शिक्षा भोगत बसले होतें इतर सर्व जसं काय सभागृहाला आग लागलीय असे पळत सुटले. मी मला धक्का मारून बाहेर पळत सुटलेल्या विस्काँन्सीनच्या गृहस्थांना आता क्षमा केली आहे.

तरुणपिढीला आवडेल असे कार्यक्रम अभावानेच जाणवले. पुढच्या अधिवेशनांत तरुणपिढी येणार नाही. खरं सांगायचं म्हणजे, पुढच्या अधिवेशनांत म्हातारीपिढी

तरी किती येईल ह्याची खात्री नाही. काही म्हातारे देवगडला बदली झाली ह्या रास्त सबबीमुळे येणार नाहीत, पण बहुसंख्य, ह्या कंटाळवाण्या अधिवेशनाला हबकून शिकागोला येतील की नाही हे नक्की नाही.

मीनाताईंचं नाटक सुरेख होतं तरीही हे कबूल केलं पाहिजे की नाटकाच्या यशाचा सिंहाचा वाटा कला-कारांचा आहे. टोरांटोच्या गायकांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दिलं कीं उत्तर अमेरिकेतरी भावगीत-नाटयसंगीत ह्या मैफीलींत त्यांना तोड नाही.

शास्त्रीय संगीतात मधुवंतीताई आश्वीनीताईंच्या अगदी धाकटी बहिण शोभतील इतल्या सुरेख गायल्या.
एक पात्री विनोदांचे प्रयोग धंदेवाईक वाटण्याइतके चांगले झाले. हे सर्व कलाकार, डॉंक्टरकी, अभियंती असे वेगवेगळे धंदे करून शिवाय इतके विनोदी असू शकतात ही अचंब्याची गोष्ट आहे. परमेश्वरा, माझे डॉंक्टर कां नाहीत इतके विनोदी.

बसची अव्यवस्था अननुभुवामुळे की अनास्थेमुळे इतकी खराब होती हे सांगणं कठीण आहे.

शिकागोच्या संयोजकांना, ह्या अधिवेशनापासून काय करू नये हे खूपच शिकण्यासारखं आहे. समझदारको इशारा काफी